**नि.फौ.ख.क्र. २१३/२०१७**
शासन वि. उमेश
**निशाणी क्र. ४०**

**<u>निशाणी ४८ च्या आदेशान्वये उलटतपास घेण्यास परवानगी देण्यात आली.</u>**

***<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा उलटतपास शपथेवर सुरूपुरावा</u> :***

**<u>उलटतपास</u>: <u>आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. डी. एन. भुजबळ यांचेमार्फत:</u>**

**३.** माझ्याकडे माझी स्वत:ची मोटार सायकल आहे. बाळासाहेब थोरात हा माझा सख्खा भाउ, भाउसाहेब थोरात माझा चुलत भाउ, गणेश थोरात हा माझा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, तळेगाव ढमढेरे येथुन कमेवाडी ला जाण्याकरीता ओढा लागतो. कमेवाडीमध्ये एकुण २५ घरे आहेत. अंदाजे कमेवाडीची एकुण लोकसंख्या दोनशे ते अडीचशे आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनास्थळाच्या शेजारी भैरवनाथाचे मंदिर आहे. हे म्हणणे खरे आहे की, भैरवनाथाच्या मंदिरामध्ये सकाळच्या वेळी लोक देवदर्शनासाठी येतात. हे म्हणणे खरे आहे की, भैरवनाथाच्या मंदिरापासुन माझे घर ३०० मीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घ टनास्थळाच्या शेजारी गणेश टिळेकर, बाळु व सुनिल व्यंकट भुजबळ, गोविंद गणपत भुजबळ यांची घरे आहेत.

**४.** शिक्रापुर पोलिस ठाणे ते कमेवाडी हे अंतर ७ कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, कमेवाडीपासुन ते ओढापर्यंतचा रस्ता खडडयाचा आहे. मी आरोपी उमेश भुजबळ, जयवंत भुजबळ, समाधान भुजबळ व अमोल ताठे यांनी माझी गाडी अडवली असे पोलिसांना सांगितले होते, त्यानंतर मी गाडी तेथेच टाकुन दवाखान्यात निघुन गेलो, परंतु तसे माझ्या फिर्यादमध्ये का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. मी शिक्रापुर येथील दवाखान्यामध्ये सकाळी १०.०० वाजता पोहचलो. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिस ठाणे येथे गेलो, पोलिसांना मार दाखविला, पोलिसांनी माझी फिर्याद घेतली त्यानंतर मला दवाखान्यात पाठविले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी पोलिस ठाणे येथे गेलो नाही.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, शेतीच्या बांधावरून आमचे व आरोपीचे वाद आहेत.

हे म्हणणे खरे आहे की, टाकळी भिमा या गावाकरीता जाणारा रस्ता आमच्या शेताच्या बांधावरून जातो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे म्हणणे आहे की, तो रस्ता सर्वांच्या मालकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या रस्त्यावरून आमचे व आरोपीचे कधीमधी भांडण होतात.

**६.** हे म्हणणे खरे नाही की, मी तथाकथित घटनेच्या दिवशी मोटार सायकल वरून पडलो. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटार सायकलवरून पडल्यामुळे माझा हात फॅक्चर झाला. हे म्हणणे खरे नाही की, येण्याजाण्याच्या रस्त्यावरून आमचा व आरोपीचा वाद असल्यामुळे खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, खोटे प्रमाणपत्र हस्तगत करून मी पोलिसांना दिले. हे म्हणणे खरे नाही की, उमेश भुजबळ, जयवंत भुजबळ, समाधान भुजबळ व अमोल ताठे यांनी मला कधीही काठीने मारहाण केली नाही किंवा शिवीगाळ केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्टीकल अ,ब,क वरील काठया कोठेही मिळु शकतात. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दिली व आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर स्विकृत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
SANJAY DIGAMBERRAO WANKHEDE
2025.08.18 17:25:51 +0530

ठिकाण : शिरूर.
दिनांक : १८/०८/२०२५.

**(सं. दि. वानखेडे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी, ता.शिरूर, जि.पुणे.